# कत्तलीसाठी गोवंश घेवून जाणारे दोन वाहन पोलीसांनी पकडले



नांदेड/प्रतिनिधी- कत्तलीसाठी गोवंश घेवून जाणारे दोन वाहन वजिराबाद पोलीसांनी आज (शुक्रवार) दुपारी हस्सापूर शिवारात पकडले असून याप्रकरणी सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हस्सापूर शिवारात दोन वाहनामध्ये दाटीवाटीने गोवंश बांधून कत्तलीसाठी घेवून जाणार असल्याची माहिती वजिराबाद पोलीसांना मिळाली. पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधिक्षक रामेश्वर वेंजने यांच्या मार्गदर्शनाखाली वजिराबाद पोलीस स्टेशनचे पो.नी.परमेश्वर कदम, सपोनी राजू वटाने, फौजदार बुलंगे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी दुपारी हस्सापूर शिवारात पिकअप वाहन क्र.एमएच २२ एएन-४३४२ व एमएच /०४ जेयु-८७६६ हे दोन वाहन पकडले. वाहनात दाटीवाटीने बांधलेले दहा गोवंशीय जातीचे जनावरे पोलीसांना आढळून आले. पोलीसांनी दोन्ही पिकअप वाहन व गोवंश जप्त केले आहे. या प्रकरणी शेख सोहेल शेख रफीक (वय २३) नसीर बशीर कुरेशी (वय ३१), मिरसाब अब्दुल शेख (वय ३१) तीघे रा.खुदबेनगर,नांदेड, सरवर गौस मोहम्मद कुरेशी (वय ३७) रा.हिलालनगर,नांदेड, रिजवान कुरेशी रा.नांदेड व उमर कुरेशी रा.परभणी यांच्या विरुध्द विविध कलमान्वये वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडला

नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी प्रकल्प ८४ टक्के भरला असून सततच्या पावसामुळे प्रकल्पाचा एक दरवाजा आज उघडण्यात आला आहे.

पावसामुळे विष्णुपुरी प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. आज दुपारपर्यंत प्रकल्पात ८४ टक्के पाणीसाठा होता. सतत पाऊस पडत असल्याने पाटबंधारे विभागाने प्रकल्पाचा एक दरवाजा उघडला आहे. त्यामधून गोदावरी नदीच्या पात्रात ४१० क्युमेक्स पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून नदीकाठच्या गावाना सुचना देण्यात आल्या आहेत.

# किनवट मधील गोभक्तांनी चाऱ्याचीच व्यवस्था करुन गोवंश वाचवावे

किनवट/प्रतिनिधी- किनवट शहरासह गोकुंदा आणि मोठ्या गावात कांही अंशी पशुपालकांची पाळीव गोवंश आणि गोधन मोकाट सोडून दिल्याने त्यांचा उदरनिर्वाह हा गावातील गोभक्तांच्या शिळ्या अन्नावर भागवला जातो. परिनामी अनेकदा शिळ्या अन्नाची विषबाधा होवून गोधन मृत्त पावतात. गोभक्तांनी शिळ्या अन्नाऐवजी चाऱ्याची व्यवस्था करुन गोधनाची भूक भागवल्यास पुण्यकर्म पदरी पडेल. म्हणून शक्यतो चाऱ्याचीच व्यवस्था करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

मोकाट गोधनांना दररोज शिळे अन्न खाऊ घातल्याने विषबाधा होतो यावर पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही शिक्कामोर्तब केल्यामुळे पशु पालकांनी गोधन मोकाट सोडूच नये असे आवाहन करण्यात आले आहे. मागच्या चार महिन्यात जवळपास २० गाईना विषबाधा झाली त्यामुळे बऱ्याच गाई उपचार करून सुद्धा मृत्यूमुखी पडल्या अशी सुद्धा माहिती आहे. कांही वर्षापुर्वी नेत्याच्या मुलाच्या लग्नातील उरलेले अन्न फेकून दिले. ते गोधनानी खाल्यातर गोधन दगावल्याचा इतिहास आहे. म्हणून गोधनांना गोभक्तांनी चाऱ्याचीच व्यवस्था केल्यास गोधन दगावणार नाही. कांही पशुपालकांनी गोधन मोकाट सोडल्याने वर्दळीच्या ठिकाणी लोकांनाही त्रास सोसावा लागतो. अपघात होतात. अपघातात कांही वेळेला जनावरंही जातात असे अनेकांचे म्हणने आहे.

# टाकळी शिवारात वीज पडून गायीचा मृत्यू

माहूर/प्रतिनिधी- तालुक्यातील शेतकरी आधीच अतिवृष्टी, पूर, घरांची पडझड व पिकांच्या उध्वस्तीनं हवालदिल झाले असताना आता विजेच्या कडकडाटानं आणखी एक मोठा घाव बसला आहे. मौजे टाकळी (चोलेवाडी) येथे ११ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री साडे आठच्या सुमारास आकाशातून कोसळलेल्या विजेने शेतकरी समाधान चोले यांची गाय जागीच ठार झाली. या घटनेत शेतकऱ्याचे सुमारे ५० हजार रुपयांचे थेट नुकसान झाले आहे.

मागील पंधरा दिवसांत सततच्या मुसळधार पावसाने तालुक्यात हाहाकार माजवला आहे. नदीनाल्यांना आलेल्या पुराच्या पाण्याने शेतं उध्वस्त झाली, अनेकांच्या घरांची पडझड झाली. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सावरण्याआधीच विजेच्या तडाख्यानं पुन्हा एकदा मोठं नुकसान सहन करावं लागलं आहे. घटनेनंतर पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दांडेगावकर, डॉ. प्रशांत बर्गे व महसूल विभागाचे सहाय्यक अधिकारी साहेबराव गावंडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मात्र केवळ पंचनाम्याने शेतकऱ्यांच्या जखमा भरून निघणार नाहीत. शासनाने तात्काळ नुकसान भरपाई जाहीर करून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, अन्यथा आधीच कर्जबाजारी व संकटग्रस्त शेतकऱ्यांची स्थिती अधिकच बिकट होईल, अशी ग्रामस्थ व शेतकऱ्यांची तीव्र मागणी आहे.

# कलंबर (बु.) च्या सरपंचपदी मंगलाबाई सोरगे बिनविरोध



उस्माननगर/प्रतिनिधी- लोहा तालुक्यातील कलंबर (बु.) येथील सरपंचपदी आ.चिखलीकर समर्थक असलेले उमाकांत सोरगे यांच्या पत्नी सौ.मंगलाबाई सोरगे यांची निवड बिनविरोध करण्यात आली आहे.

कलंबर बु.येथील ग्रामपंचायत ही १७ सदस्य संख्या असलेली सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून तालुक्यात नावलौकिक आहे. येथील सरपंचपद हे सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले होते. येथील तत्कालीन सरपंच यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याबद्दल हे प्रकरण हायकोर्ट बोम्बे बॅच औरंगाबाद यांच्या न्यायालयात ठेवण्यात आले होते. यावेळी निकालानुसार सरपंचाचे पद रद्द करण्याची आदेश दिले होते. तहसीलदार लोहा यांच्या आदेशानुसार विशेष ग्रामसभेचे आयोजन ८ सप्टेंबर रोजी सरपंच निवडीची प्रक्रिया अध्यासी अधिकारी डी.एच.देशपांडे व ग्रामसेवक ए.व्ही. शिंदे यांनी पुर्ण केली. ग्रामपंचायत सतरा सदस्यांची असली तरी अपात्र व गैरहजर सदस्यांमुळे, उपस्थित नऊ सदस्यांनी सरपंचाची निवड केली. यावेळी अनुमोदक म्हणून माधव मोकले यांनी सरपंच म्हणून सौ.मंगलबाई उमाकांत सोरगे यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला होता. निवडणूक अधिकारी यांनी नियमानुसार सदरील सरपंच म्हणून सौ.मंगलबाई उमाकांत सोरगे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करुन सत्कार करण्यात आला. निवडीनंतर गावातून मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी अध्यासी निवडणूक अधिकारी तथा पंचायत विस्तार अधिकारी डी.एच. देशपांडे, ग्राम पंचायत अधिकारी ए.व्ही. शिंदे, ग्रा. पं. कर्मचारी, सपोउनि मुंडे, पोहेकॉ मधुकर पवार, पो. कॉ. बोरकर यांची उपस्थिती होती.

# आरोग्य व परंपरेच्या रक्षणासाठी कर्णकर्कश डीजेला विरोध




> सर्व ग्रुपच्याच्यावतीने डीजे बंदीसाठी लोकचळवळ उभी करण्यात येणार असुन लवकरच शहरात व तालुक्यातील नागरिकांची स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात येणार असुन डीजे पासुन त्रस्त असलेल्या जनतेनी यासाठी आपला पाठिंबा दयावा अशी विनंती करण्यात आली आहे.

उमरखेड/प्रतिनिधी- शहरातील विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक संघटनांनी एकत्र येऊन समस्या निराकरण समाधान या नावाने व्हाट्सअप ग्रुप स्थापन केला असून, नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी हे व्यासपीठ कार्यरत झाले आहे. याच अनुषंगाने शहर व तालुक्यातील सर्वात मोठी समस्या ठरलेल्या डीजेच्या कर्णकर्कश आवाजा विरुद्ध उमरखेडकरांनी पहिलं पाऊल उचलले आहे.

११ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी तथा पोलिस निरीक्षक पोलीस स्टेशन उमरखेड यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनातून सण-उत्सव, मिरवणुका, विवाहसमारंभ, वाढदिवस आदी कार्यक्रमांमध्ये डीजे वापरावर संपूर्ण बंदी घालावी अशी ठाम मागणी यात करण्यात आली आहे. डीजेच्या अत्याधिक आवाजामुळे विद्यार्थी, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांवर डीजे मुळे होणारा दुष्परिणाम उल्लेखित केला असून, त्याचे उल्लंघन करणाऱ्या विरुद्ध कडक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी विजय आडे, ऍड. शिवाजी वानखेडे, दिपक ठाकरे, गणेश शिंदे, राजीव देशपांडे, डॉ. धनंजय व्यवहारे, अझरउल्ला खान, जमीर खतीब, सुरेश वाघ, श्रीराम चव्हाण, प्रभाकर दिघेवार, संजय भंडारे, दिपक ग्यानचंदाणी, कैलास उदावंत, सुनील चिंचोलकर, प्रशांत आयाचित, विजय हरडफकर, साहेबराव कदम, शुद्धोधन दिवेकर, भगवान इंगळे, विजय कदम, स्वप्नील मगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आपल्या पारंपरिक सण-उत्सवांचा आनंद शांततेत, आरोग्याला अपाय न होता आणि कायद्याचे पालन करतच व्हावा, हा या मोहिमेचा उद्देश आहे. त्यामुळे पुढील काळात उमरखेडमध्ये डीजेविरोधी मोहीम अधिक जोर धरू लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महाडीबीटी पोर्टल योजना शेतकऱ्यांसाठी कुचकामी

मांडवी/प्रतिनिधी- महाडीबीटी पोर्टल शेतकऱ्यासाठी सरकारी योजना सुरू करण्यात आली असली तरी हि योजना कुचकामी ठरत आहे. यामुळे अनेक लाभार्थी शेतकरी शासनाच्या विविध योजना पासून वंचित राहत आहे.

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना लाभ मिळवून देण्यासाठी व शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी बनवलेले पोर्टल महाडिबीटि सुरू केले आहे. यामध्ये शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा लागतो. महाराष्ट्र शासन लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करते. निवड झालेल्या लाभार्थ्यांना डिबीटी द्वारे योग्य लाभ आधार लिंक बँक खात्यात जमा केला जातो. या महाडीबीटी योजना हे शेतकऱ्यांना तारक असली तरी पण आता या योजनेमध्ये विविध समस्या निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांना मारक ठरत आहे. लॉगिन न होणे साईट बंद असणे, पोर्टल बंद असणे त्याचबरोबर तांत्रिक समस्या हे नेहमीच झालेला आहे. तसेच शेतकऱ्यांना आपली योजनेसाठी निवड झाली असा मेसेज येऊन सुद्धा कागदपत्र अपलोड करण्यासाठी सी.एस.सी केंद्रावर गेले असता तेथे कोणतहि निवड झालेली दाखवत नाही. एकीकडे मेसेज येतो तर दुसरीकडे आपली निवड नाही झाली असे दाखवत असल्याने, लाभार्थी शेतकरी गोंधळून जात आहे. गावापातळीवर शासनाचे काम करणारे कृषी सहायक लाभार्थी शेतकऱ्यांना माहिती देतात. पण त्याचा फायदा होताना दिसत नाही. तेव्हा शासनाने शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी सुरू केलेली महाडीबीटी पोर्टल हे योग्य पद्धतीने कार्यान्वित करून गरजू शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा अशी मागणी केली जात आहे.


## कार्यालय नगरपरिषद, कंधार जि.नांदेड

ई-मेल cokandhar@gmail.com — टोल फ्री क्र.18002333438
दुरध्वनी क्र. कार्यालय (02466) 223438 — जा.क्र./1812/2025
शाखा: प्रशासकीय — दिनांक 11/09/2025

### जाहीर सुचना

याद्वारे कंधार शहरातील नागरीकांना कळविण्यात येते की, कंधार ''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५'' चा महाराष्ट्र, अध्यादेश क्र.५ च्या कलम ३ अन्वये नगरपरिषद कंधार जि.नांदेड अंतर्गत नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या एकूण ६४ लोकसेवाची सुची, आवश्यक कागदपत्रे, शुल्क, नियत कालमर्यादा, पद निर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी या बाबी खालील QR Code मध्ये नमूद केल्या प्रमाणे QR Code स्कॅन करुन सर्व अधिसुचित सेवांचा तपशिल पाहता येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद कंधार





मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तरोडा (खु.) मुळ गावातील साईनाथ प्रकाश कोरडे या तरुणाने आत्महत्या केली होती. या तरुणाच्या कुटुंबियाला दहा लाख रुपयांचा धनादेश प्रशासनामार्फत आ.बालाजी कल्याणकर व तहसीलदार संजय वारकड यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी उत्तमराव कल्याणकर, शिवाजीराव कल्याणकर, व्यंकटराव कल्याणकर, शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे,मोतीराम मुंडे, डॉ.श्रीराम कल्याणकर, किशन कल्याणकर यांच्यासह इतर उपस्थित होते.

पान १ वरुन

### राज्यातील ३४ जि.प.अध्यक्षांचे...

नागपूर-नागरिकांचा मागास प्रवर्ग, वर्धा-अनुसूचित जाती, भंडारा-नागरिकांचा मागास प्रवर्ग, गोंदिया-सर्वसाधारण (महिला), चंद्रपूर- अनुसूचित जाती (महिला), गडचिरोली जि.प.अध्यक्षपद सर्वसाधारण (महिला) साठी राखीव ठेवण्यात आले आहे.

### नेपाळात भारतीय यात्रेकरुंवर...

एका बसवर मोठा हल्ला झाला. आंध्र प्रदेशातील यात्रेकरू पशुपतिनाथ मंदिराचे दर्शन करून परत येत असताना त्यांच्या बसवर समाजकंटकांनी अचानक दगडफेक सुरू केली. बसच्या सर्व खिडक्या फोडण्यात आल्या, प्रवाशांना मारहाण करण्यात आली आणि त्यांचे मोबाईल फोन, बॅगा व रोख रक्कम लुटण्यात आली. या हल्ल्यात सात ते आठ जण गंभीररीत्या जखमी झाले असून उर्वरित प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बसचे चालक राज यांनी सांगितले की, भारताकडे परतत असताना अचानक जमावाने आमच्या बसवर दगडफेक केली. आमचे सर्व सामान लुटले गेले. प्रवाशांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती.

### नांदेडमध्ये आज मुसळधार...

वाढणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय.राज्यभरात गेल्या तीन ते चार दिवसांपासून पाऊस पुन्हा एकदा हजेरी लावत असल्याचे चित्र आहे. मराठवाडा विदर्भात सक्रिय असलेला पाऊस आता राज्यभर व्यापार असून पुढील चार दिवस विविध जिल्ह्यांना हायअलर्ट देण्यात आले आहेत. पुढील दोन दिवस विदर्भ मराठवाडासह मध्य महाराष्ट्रात पावसाची जोरदार हजेरी राहणार आहे. रविवारपासून विदर्भात पावसाचा जोर कमी होणारा सून मराठवाडा मध्य महाराष्ट्र उत्तर महाराष्ट्र व कोकण किनारपट्टीवर पावसाला पोषक वातावरण असेल.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४